www.sahyandrinews.com

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १६१ • Title - Code :- MAHMAR49513 • बुधवार दि.१३ मार्च २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# आदिवासी देशाचे मूळ मालक

# मोदींनी उद्योगपतींचे १६ लाख कोटींचे कर्ज माफ केले, पण आदिवासींना कवडीही दिली नाही - राहुल गांधी

**नंदुरबार (वृत्तसंस्था)–काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या भारत जोडो न्याय यात्रा मंगळवारी महाराष्ट्रात दाखल झाली. त्यानंतर त्यांनी आदिवासी बहुल नंदूरबार जिल्ह्यातील टेंभली येथे जाहीर सभा घेतली. यावेळी त्यांचे स्थानिक आदिवासींनी स्वागत केले. यावेळी राहुल गांधी यांनी मोदी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. एकीकडे मोदी सरकारने या देशातील उद्योगपतींचे १६ लाख कोटी कर्ज माफ केले, पण आदिवासींना एक रुपयांचाही दिलासा दिला नाही, हे सरकार केवळ उद्योगपतींचा विचार करते, असा घणाघात गांधी यांनी मोदी सरकारवर केला.**



राहुल गांधी म्हणाले की, बीजेपी तुम्हाला वनवासी म्हणते पण आम्ही तुम्हाला आदिवासी म्हणतो. देशाची पहिली ओळख असलेल्या आधारकार्ड सर्वात आधी आम्ही या नंदुरबारमध्येच का लागू केला. कारण आम्हाला संदेश द्यायचा होता की, आदिवासी हेच मुळ मालक आहेत. येथील जमीन, पाणी, जंगलावर तुमचा हक्क आहे. बीजेपी तुम्हाला वनवासी म्हणते आणि जंगल संपवण्याचे काम करते. जंगल, जमीन हे सर्व अदानी सारख्या करोडपतींना दिली जाईल आणि मग बीजेपी तुम्हाला म्हणेल की, तुम्ही वनवासी आहात, जंगल तर राहिलेच नाही. तुम्हाला रस्त्यावर आणण्याचे काम हे मोदी सरकार करत आहे, असा हल्लाबोल राहुल गांधी यांनी केला.राहुल गांधी पुढे म्हणाले की, नरेंद्र मोदी यांनी देशातील २० ते २५ करोडपती उसलेल्या उद्योगपतींचे १६ लाख कोटी रुपये कर्ज माफ केले. पण आदिवासी बांधवांचा एक रुपयाही माफ केला नाही. महाविद्यालयीन युवा, महिलांचा विचार कधी झाला नाही. एक रुपयांची मदत देखील झाली नाही. दुसरी गोष्ट म्हणजे १६ लाख कोटी रुपये ही रक्कम किती मोठी आहे हे देखील तुम्ही लक्षात घ्या. २४ वर्षांला जेवढा मनरेगाला पैसा लागणार होता तेवढा पैसा या २० ते २५ करोडपती लोकांचा पैसा माफ झाला आहे. यामध्ये अदानी, अंबानी यासारख्या लोकांचा यात समावेश आहे. यांच्याकडे एवढा पैसा आहे की, देशातील ७० कोटी लोकांकडे जेवढा पैसा आहे तेवढा पैसा या बोटावर मोजण्याइतक्या लोकांकडे आहे. उद्योगपतींसाठी हे सरकार सगळ करत आहे. पण आदिवासी, गरीबांसाठी काहीही करत नाही, असे म्हणत राहुल गांधी यांनी जोरदार हल्लाबोल केला. राहुल गांधी म्हणाले की, मोदी मीडिया, अदानी मीडिया यात कोणत्याही आदिवासींचा यात समावेश होत नाही. मुळात या ठिकाणी असलेल्या पत्रकारांची चूक नाही कारण हे पगारामुळे बांधिल आहे. मोठ मोठ्या अँकर व रिपोर्टरची लिस्ट जर तुम्ही काढली तर टीव्हीवर कधी आदिवासी रिपोर्टर पाहिला का, मीडियामध्ये तुमची शून्य टक्के भागीदारी आहे. जमीन, जल, जंगलाचा मुद्दा मीडियामध्ये दिसणार नाही. सोशल मीडियावर हे प्रश्न येतील पण माध्यमांवर येऊ शकत नाही, कारण हा मीडिया देखील बांधिल आहे. दुसरे म्हणजे देशातील सर्वात मोठ्या २०० कंपन्यांची लिस्ट काढा त्यात आदिवासी किती आहेत त्यात एकही आदिवासी दिसणार नाही. तुम्ही मोठ्या कंपन्यांमध्ये देखील आदिवासींची भागीदारी नाही.राहुल गांधी म्हणाले की, मोदी सरकार हे ९० लोक चालवतात. त्यात आदिवासी नेते किंवा प्रतिनिधी किती आहे. त्यात एक व्यक्ती आहे पण त्यालाही कोपऱ्यात ठेवलेले आहे. आदिवासींची जनसंख्या ८ टक्के आहे. तुमची भागिदारी १०० पैकी ८ पैसे. भारतात कुठेही जा, आदिवासींवर अन्याय होत आहे. मोठे मोठे प्रोजेक्ट येतात पण त्यात जमीन ही आदिवासींची जाते. गुजरातमध्ये २५ टक्के जमीन घेतली गेली. ती सर्व जमीन आदिवासींची आहे. पाणी, जमीन, जंगल हे सर्व आदिवासींचे जात आहे. मग देशात विकास कुठला होत आहे, असा सवाल देखील राहुल गांधी यांनी केला.राहुल गांधी पुढे बोलताना म्हणाले की, पब्लिक स्कूल, प्रायव्हेट स्कूल, हॉस्पिटल यांची लिस्ट काढली त्यात कुठेही आदिवासी दिसत नाही. हे सर्व आम्हाला बदलायचे आहे.

## बेपत्ता व्यक्तीचा मृतदेह आढळला

**पुलगाव । प्रतिनिधी**

नजिकच्या नाचणगाव येथील दामोदर बंडू सावरकर (वय ५२) हे ३ मार्च २४ ला नाचनगाव येथील आपल्या घरून निघून गेला होता. सोशल मीडियावर हरविले असे प्रत्रक पाहायला मिळाले. ११ मार्चला सायंकाळी ५ वाजता किशोर गायधने यांच्या शेतात विहीऱीमधे मृतदेह आढळला.सर्व नाचनगाव परिसरात खळबळ उडाली.राऊत यांनी गायधने यांच्या शेतात विहीऱीमधे पाहीले. तेव्हा मृतदेह आढळला.



विहीरीतून बाहेर काढले असता माहीत पडले की दामोदर सावरकर चा मृतदेह आहे. पुलगाव ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी आणले. आज १२ मार्चला परिवारातील सदस्यांना शव देण्यात आले. दामोदरच्या मागे पत्नी,दोन मुले, आई, वडील,भाऊ असा बराच मोठा परिवार आहे. स्थानिक मोक्षधाम मधे अंतिम संस्कार करण्यात आले.

## बालाघाटच्या व्यक्तीचा अतिमद्यसेवनाने मृत्यु




**पुलगाव । प्रतिनिधी**

येथील रेल्वे स्टेशन बाहेरील चौकामध्ये दशाराम रामचंद्र नागेश्वर हा बालाघाट जिल्यातील किन्नोर तालुक्यातील आमगावचा व्यक्ती अतिमद्यसेवन करून पडला होता.हल्ली हिंगणघाट तालुक्यातील कानगाव येथे राहात होता.स्थानिय दखणी फैल निवासी महेश जंगलूजी साहू याच्या निदर्शनात आल्यावर त्याने पोलिसात सूचना दिली. त्याला ग्रामिण रुग्णालयात दाखल केले असता मृत घोषित करण्यात आले.पुलगाव शहरातील लोकांना या घटनेबद्दल कळताच त्यांनी वर्गणी गोळा करून रुग्णवाहिकेद्वारे त्याच्या मुळ गावी परिवारासह रवाना केले. याप्रकरणी पोलिस उपनिरीक्षक संदीप चव्हाण व शरद सानप तपास करीत आहेत.

## आकापूर गावात दुसऱ्यांदा चोरी

## एकोणसाठ हजार रुपयांचा माल चोरांनी पळविला

**तळोधी (बा ) । प्रतिनिधी**

तळोधी पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या आकापूर येथे येथील दानोदास वातुजी भाकरे यांच्या घरी अज्ञात चोरांनी रात्रीच्या सुमारास घरात प्रवेश करून एकोणसाठ हजार रुपयांचा माल लंपास केल्याची घटना रविवारी रात्री दि.१० मार्च रोजी घडली.एकाच महिन्यातील सदर गावात घडलेली ही दुसरी घटना आहे. आकापूर येथील दानोदास वातुजी भाकरे हे रविवारी रात्री कुटुंबियांसह घरातील समोरच्या खोलीत झोपले असताना अज्ञात चोरांनी मागील दाराची कडी काढून घरात प्रवेश केला आणि मधल्या खोलीतील गोदरेज आलमारी फोडून तेथील १० ग्रॅम सोन्याचा गोफ,३ ग्रॅम सोन्याची अंगठी,३ ग्रॅम सोन्याच्या मंगळसूत्राचे पदक,३ ग्रॅम सोन्याचे मनी, दीड ग्रॅम सोन्याची जिवती,३ ग्रॅम सोन्याची अंगठी,सोन्याच्या मंगळसूत्राचे २ पदक,



चिल्लर दोनशे रुपये असा एकूण ५९ हजार दोनशे रुपयांचा माल चोरांनी लंपास केला.तीन दिवसापूर्वीच आकापुरात चोरांनी दीड लाखाची चोरी केली होती. आणि दोन दिवस होत नाही तर ही दुसरी चोरीची घटना घडल्याने गावकऱ्यांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.दरम्यान अज्ञात चोरांविरोधात तळोधी पोलिसांनी गुन्ह्यांची नोंद केली असून सपोनि.अजितसिंग देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक लांबट,सचिन साखरकर अधिक तपास करीत आहेत.

## विशेष दर्जा हटलेल्या मुंबई–बल्लारशाह सुपरफास्ट एक्सप्रेसचे आज हंसराज अहीर व नागरीकांच्या उपस्थितीत जंगी स्वागत

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

लोकमान्य टिळक टर्मिनस् ते बल्लारशाह या साप्ताहिक सुपरफास्ट ट्रेनचा विशेष दर्जा (स्पेशल )हटविण्यात आल्यानंतर चंद्रपूर–बल्लारशाह येथे दि. १३ मार्च २०२४ रोजी पोहचणाऱ्या या गाडीचे स्वागत मागासवर्गीय आयोगाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा पुर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपा कार्यकर्ते व रेल्वे प्रवासी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांकडून करण्यात येणार आहे. एलटीटी–बल्लारशाह सुपरफास्ट एक्सप्रेसला (नं. ०११२७/०११२८) यापुर्वी स्पेशल दर्जा असल्याने या ट्रेनचे भाडे प्रवास्यांना परवडणारे नव्हते स्पेशल दर्जा असल्याने ही ट्रेन नेहमीच उशिरा धावायची प्रवास्यांच्या अडचणीची दखल घेत हंसराज अहीर यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री, वरीष्ठ अधिकारी यांचेशी पत्रव्यवहार, चर्चा करून स्पेशल दर्जा हटविण्यात यश मिळविले. त्यामुळे या गाडीचे भाडे ३० टक्के कमी होणार असून ती वेळेवर चालणार आहे. आता एलटीटी–बल्लारशाह ट्रेन (नं. २२१०९/२२११०) ही साप्ताहीक गाडी एलटीटी स्थानकावरून रात्री ०९.४५ वा. निघून दि. १३ मार्चला चंद्रपूर स्थानकावर स. १०.५६ वा. तर बल्लारपूर येथे दु. १२.०० वा. पोहचेल. बल्लारशाहून दु. ०१.४० ला मुंबईकरीता प्रस्थान करेल चंद्रपूर स्थानकावर दु. ०१.५७ पोहचणार आहे. दोन्ही स्थानकावरून हिरवी झेंडी दाखवून ही गाडी मुंबईकरीता रवाना केली जाईल. सदर गाडीला त्रीसप्ताहिक करण्याचे हंसराज अहीर यांचे प्रयत्न सुरू असून त्याबाबत लवकरच निर्णय होण्याची शक्यता आहे.




## पीएम–सुरज योजनेचा १३ मार्च रोजी पंतप्रधानांच्या हस्ते शुभारंभ

### वन अकादमी येथे दूरदृष्यप्रणाली द्वारे उद्घाटन



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

देशाच्या मुख्य प्रवाहापासून वंचित असलेल्या अनुसूचित जाती, इतर मागासवर्ग (ओबीसी) व सफाई कर्मचाऱ्यांच्या पाल्यांकरीता शिक्षणाच्या प्रभावी सुविधा, शिष्यवृत्ती तसेच सिमांत वर्गाचे शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक सशक्तीकरण व अल्प व्याजदरात कर्जाद्वारे आर्थिक सहाय्यता आदी प्रयोजनार्थ राष्ट्रव्यापी स्तरावर राबविण्यात येत असलेल्या पीएम–सुरज (प्रधानमंत्री–सामाजिक उत्थान व रोजगार आधारीत जनकल्याण) या महत्वाकांक्षी योजनेत चंद्रपूर जिल्ह्याचा समावेश करण्यात आला आहे. या योजनेचा शुभारंभ १३ मार्च रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृष्यप्रणालीद्वारे सायंकाळी ४ वाजता होणार आहे. वन अकादमी येथे होणा–या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर उपस्थित राहणार आहेत.

देशभरातील ५२५ जिल्ह्यात ही सामाजिक सशक्तीकरण योजना राबविण्यात येत असून महाराष्ट्रातील ९ जिल्ह्यांचा या योजनेत प्रारंभिक स्तरावर समावेश करण्यात आहे. या जिल्ह्यांसाठी प्रमुख अतिथी म्हणुन केंद्रीय कॅबिनेट मंत्री व राज्यमंत्र्यांचा समावेश आहे. मुंबईकरीता केंद्रीय मंत्री पियुष गोयल, नागपूरकरीता केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, सिंधुदूर्ग येथे केंद्रीय मंत्री नारायण राणे, नाशिककरीता केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भारती पवार, धुळे येथे केंद्रीय राज्यमंत्री भागवत कराड, सोलापूर येथे केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, अहमदनगर करीता केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे, हिंगोली येथे केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांचा समावेश आहे.वन अकादमी येथे दूरदृष्यप्रणालीद्वारे होणा–या या कार्यक्रमाला राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यासह जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन व प्रशासनाचे इतर अधिकारी उपस्थित राहतील.

## नांदेड येथे उमेद तर्फे ग्राम स्वच्छता अभियान

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील नांदेड येथील महिलांनी दि.९ मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्य ग्राम स्वच्छता अभियान राबवून विविध कार्यकमाचे आयोजन केले.

शनिवारी सकाळी सहा वाजता जागतिक महिला दिनाचे निमित्याने ग्राम स्वच्छता अभियान राबविण्यात आले.सकाळी ११ वाजता संपूर्ण गावातून रॅली काढण्यात आली.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे प्रमुख व्यक्ती सरपंच मुर्लीधर गौरकार होते.तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून दिशा लोक संचालीत साधन केंद्राचे शिक्षक मुंगमोडे,समन्वयक सल्लागार जया मेश्राम होत्या. प्रमुख अतिथी म्हणून ग्रा.पं.सदस्य रजनी कुंबरे,शिल्पा रामटेके,दुर्गा कामडी,गोपिका मरापे,रत्नमाला मेश्राम,संगीता सिडाम,शितल बारसागडे,उन्नती महिला ग्रामसंघाच्या अध्यक्ष मनीषा खामदेवे, सचिव साधना खोब्रागडे,उडान प्रभाग संघाच्या शारदा बोरकर,प्रवीण रामटेके, मंजुषा घुगुस्कर,कृषी सखी संगीता सोनवणे,सीआरपी स्वाती प्रकाश मरापे,प्रणिता परीश शेंडे यांची उपस्थिती होती.संचालन सुरेखा रवींद्र आत्राम यांनी केले.तर आभार वनिता श्याम आत्राम यांनी मानले.

## भाजपने माझ्यासोबत धोका केला:ज्या दिवशी मी धोका देईल तेव्हा सरकार राहणार नाही- जानकर

**परभणी**–भाजपनं माझ्यासोबत धोका केला. मात्र ज्या दिवशी मी यांना धोका देईल त्या दिवशी यांचे सरकार राहणार नाही असा रोखठोक इशारा महादेव जानकर यांनी दिला आहे. तसेच परभणी लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल करण्यावरही ठाम असल्याचे त्यांनी सांगितले. परभणीत रासपच्या लोकसभा विजय निर्धार मेळाव्यात महादेव जानकर बोलत होते.



यावेळी बोलतांना त्यांनी भाजपवर निशाणा साधला आहे. ते म्हणाले, ''भाजपने माझ्यासोबत धोका केला, मात्र मी त्यांच्यासोबत इमानदारीने राहिलो. ज्या दिवशी मी यांना धोका देईल त्या दिवशी यांचे सरकार राहणार नाही. मला मुख्यमंत्री नाही व्हायचे, पाच मिनिटं का होईना मला पंतप्रधान व्हायचंय'', असे म्हणत पुन्हा एकदा महादेव जानकर यांनी भाजपवर हल्लाबोल केला आहे.दरम्यान, गोपीनाथ मुंडे गेल्याने पंकजा मुंडेंपेक्षा जास्त माझी वाताहत झाली असल्याची खंत रासपचे प्रमुख महादेव जानकर यांनी परभणीत बोलुन दाखवलीय. गोपीनाथ मुंडे हयात असते तर मी आज केंद्रात मंत्री राहिलो असतो असेही ते म्हणाले. विशेष म्हणजे लोकसभा निवडणुकीच्या जागावाटपात महायुतीत जानकर यांना स्थान दिले जात नसल्याने ते नाराज आहेत.लोकसभा निवडणुकीत महायुतीमधील जागावाटपाचा फॉर्म्युला अद्याप निश्चित झालेला नाही. अशात मित्रपक्षांना मात्र भाजपकडून दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप केला जात आहे. ''महायुतीसोबत राहूनही महायुतीचे नेते आम्हाला विचारायला तयार नाहीत. मात्र आम्ही आमचं सक्षम आहोत. कुणी आम्हाला कितीही डावलल तरीही काहीही फरक पडणार नाही. महायुतीला आमची गरज नाही, तर आम्हालाही त्यांची गरज नाही'', असेही जानकर म्हणाले आहेत.रासपकडून परभणी लोकसभा मतदारसंघासाठी महादेव जानकर रिंगणात असणार आहेत. त्यानिमित्ताने परभणी लोकसभा मतदारसंघातील रासप कार्यकर्त्यांचा लोकसभा विजय निर्धार मेळावा जानकर यांच्या उपस्थितीत घेण्यात आला. यावेळी जानकर यांनी संपुर्ण कार्यक्रम हा व्यासपीठावर न जाता, खाली कार्यकर्त्यांमध्ये बसुन भाषण केले. तसेच कार्यकर्त्यांनी जानकर यांना पैश्यांचा हार घातला. या मेळाव्याला रासपच्या सर्व पदाधिकाऱ्यांसह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी बोलतांना महादेव जानकर यांनी भाजपला लक्ष करत लोकसभेतील जागावाटपावरून इशारा देखील दिला आहे.

# प्रेम हेच ईश्वर;प्रेमच ईश्वरपूजा!

**आजच्या काळात जास्तकरून प्रेम शब्दाला स्त्री व पुरुष यांच्या प्रेम प्रसंग- प्रणय यांच्याशी जोडून पाहिले जाते. परंतु प्रेम हे जगातील कोणत्याही वस्तुशी अथवा व्यक्तीशी होऊ शकते. प्रेमाच्या प्रभावानेच सृष्टीतील लोक एक दुसऱ्याची मदत करतात, एक दुसर्याच्या जीवनात सहयोग करता. याशिवायही प्रेमाचे अनेक रूप आहेत. जसे पतीपत्नीचे प्रेम, भाऊ बहिणीचे प्रेम, मित्रांचे आपापसातील प्रेम, प्रियकर आणि प्रेयसीचे प्रेम, गुरु आणि शिष्यचे प्रेम इत्यादी इत्यादी. प्रेमाशिवाय मनुष्य जीवन संभव नाही. म्हणूनच प्रेम हेच जीवन आहे, असे म्हटले जाते. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे खरे प्रेम हे नेहमी निस्वार्थ असते, स्वार्थी तर लोक असतात जे त्याला विकृत स्वरूप देतात. अशी उद्बोधक माहिती श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरुजींच्या सदर लेखात जरूर वाचा... संपादक.**

**खरा तो एकचि धर्म!**
**जगाला प्रेम अर्पावे!धृ.!**
**जगी जे हीन अतिपतित!**
**जगी जे दीन पददलित!!**
**तया जाऊन उठवावे!**
**जगाला प्रेम अर्पावे!!**

पूज्य साने गुरुजींनी तर मानवधर्मच प्रेमावर अवलंबून असल्याचे सांगितले आहे. प्रेम काय आहे? खऱ्या प्रेमाचे वर्णन करणे खुप कठीण आहे. खरे प्रेम त्या सागरासारखे आहे ज्याची खोली न मोजता येण्यासारखी आहे. खरे प्रेम ती भावना आहे जी एखादी वस्तू, व्यक्ती, स्थान, जीव अथवा ईश्वराविषयी तयार होते. प्रेमाचा सरळ संबंध भावनेशी आहे. प्रेमाचा हा सिद्धांत प्राणी आणि धार्मिक विश्वासांवरही लागू होतो. उदाहरण म्हणून एखादी व्यक्ती तिच्या कुत्र्याशी खुप प्रेम करते, स्वातंत्र्य सैनिकाला स्वातंत्र्याशी प्रेम आहे किंवा एखाद्या व्यक्तीला परमेश्वराशी प्रेम आहे. अशा पद्धतीने प्रेमाची विविध रूपे असतात. प्रेमाला विशिष्ट मर्यादेत बांधता येत नाही. प्रेम स्वच्छंद उडणाऱ्या पक्ष्याप्रमाणे स्वतंत्र असते. खरे पांडित्य अडिच अक्षराच्या प्रेमाभ्यासाने येते, असे संतशिरोमणी कबीरजी महाराज म्हणतात-

**पोथी पढ़ पढ़ जग मुवा।**
**पण्डित भया न कोय।।**
**ढाई अक्षर प्रेम का।**
**पढे सो पण्डित होय।।**

प्रेमाचा खरा अर्थ निस्वार्थ भावनेने समोरच्याला सर्वस्व अर्पण करणे हाच आहे. आपल्या प्रेमीच्या हित आणि आनंदासाठी स्वतःच्या आनंदाचा त्याग करणे, खरे प्रेम आहे. प्रेम जीवन देते जीवन घेत नाही. प्रेम परमेश्वराने दिलेली समतुल्य, पवित्र आणि महान वस्तू आहे. मनुष्य या पवित्र प्रेमाला त्याच्या स्तरावरून खाली ओढत आहे. मनुष्याने प्रेमाला इच्छा आणि वासना पर्यंत मर्यादित केले आहे. म्हणून आज हे स्वार्थीप्रेम हे हत्या आणि आत्महत्यांचे सर्वात मोठे कारण बनले आहे. प्रेम देणारा समर्पण भावनेने वागतो, मात्र प्रेम घेणारा आपले नाते- संबंध काय? हे विचारात न घेताच त्याचा गैरफायदा उठवतो. गुरू-शिष्य हे नाते मातृप्रेमाचे असते, मात्र संधीसाधू, भोंदूगुरू हा शिष्याच्या जवळिकतेच्याच सुवर्ण संधीप्रमाणे वाट बघत असतो. संधी हाती येताच तो हलकट-लंपट दुष्कृत्य, अत्याचार, अनाचार, भ्रष्टाचार वा बलात्कार करून पवित्र नाते कलंकित करतो. गुरूबंधू-गुरूसिख यांचे परस्परातील नाते हे बहिणभावाचे असावयास हवे, मात्र तेही असेच वासनांध भावनेतून स्वतःच्या उजळ रुपाला काळिमा फासून घेतात. अशा आपल्या दुर्व्यवहारी- व्याभिचारी वृत्तीने समाजाचे शी-थूऽऽऽ..! तोंडावर पाडून घेतात आणि आजिवन तुरुंगात सडतात. यामुळेच भक्तीमार्ग संशयाच्या भोवऱ्यात अडकला आहे. अशांना ज्ञानी- गुणी कोण म्हणेल? ईश्वर हे प्रेमाचेच नाव आहे, मग या विधानाची सत्यता गोत्यात तर येणारच ना!

**अनेकचित्त विभ्रांता मोहजाल समावृत्ताः।**
**प्रसक्ताः कामभोगेषु पतन्ति नरकेऽशुचौ।।१६।।**
**(पवित्र श्रीमद् भगवद्गीताः अध्याय- १६: दैवासुर संपद्विभाग योग)**

अर्थ: नाना प्रकारच्या कल्पनांनी भ्रमित, मोहाच्या जाळ्यांत पूर्णपणे गुरफटलेले आणि विषयभोगांत लंपट झालेले हे आसुरी स्वभावाचे लोक अखेरीस अमंगळ नरकांत रूततात.

जर तुम्ही कोणाशी खरे प्रेम करीत असाल, परंतु या गोष्टीपासून चिंतीत असाल की तुमचा प्रेमी देखील तुम्हाला असेच निस्वार्थ प्रेम करतो की नाही. तर चला आता आपण जाणून घेऊया की खरा प्रेमी अथवा प्रेमिकाचे गुण कोणते आहेत- सन्मान करणे: मान सन्मान कोणत्याही व्यक्तीचे आभूषण असते. जर तुमचा प्रेमी तुमचा खुप सन्मान करीत असेल व तुमच्या सोबतच इतरांशी देखील सन्मानाने वागत असेल तर तो व्यक्ती निश्चल मनाचा आहे. आजकाल अनेक प्रेमी- प्रेमिका आहेत, काही वरवर तर काही एक दुसऱ्यावर निस्सीम प्रेम करतात. परंतु लहान मोठ्या गोष्टीवर शिव्या देणे आणि चारित्र्यावर संशय घेणे असा त्यांचा व्यवहार असतो. जर एखादी व्यक्ती असे करीत असेल तर ती कपटी मनाची व स्वार्थी व्यक्ती आहे. स्वतःपेक्षा जास्त तुमच्यावर विश्वास ठेवणे: खरे प्रेमी स्वतःपेक्षा जास्त एकमेकांवर विश्वास ठेवतात. विश्वास ठेवल्याने एकमेकांमधील नाते आणखी मजबूत होते. जर तुमचा प्रेमी- प्रेमिका तुमच्यावर विश्वास ठेवत नसेल आणि तुमच्या लहान मोठ्या गोष्टीवर संशय करीत असेल, तर अशा व्यक्तीपासून दूर राहिलेलेच चांगले. काळजी घेणे: खरे प्रेमी- प्रेमिका एकमेकांची नेहमी काळजी घेतात. त्यांना स्वतःपेक्षा जास्त आपल्या प्रेमीची चिंता असते. जर प्रेमी- प्रेमिका वाईट परिस्थितीतून जात असेल, तर अशावेळी एक खरा प्रेमी नेहमी विश्वास आणि काळजी घेतो. एका आईप्रमाणे निस्वार्थ भावनेने आपल्या प्रेमीची काळजी करतो. नेहमी खरे बोलणे: खरा प्रेमी तुमच्याशी नेहमी खरे बोलेल. त्याचा काही भूतकाळ असेल, तर त्याबद्दलची माहिती तो तुम्हाला आधीच देईल. जर तुम्ही देखील कोणावर प्रेम करीत असाल परंतु त्याला आपला भूतकाळ सांगितला नसेल, तर न घाबरता सर्वकाही सांगून टाकावे. कारण खरे प्रेम हे शरीरावर होत नसून हृदयावर केले जाते. खरे प्रेम तुमच्या सर्व चुकांना माफ करायला



**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
**मु.पो.ता.जि.गडचिरोली**
**दूरभाष- ७७७५०४१०८६.**

तयार असते. प्रेमात नमुन जाणे: चूक कोणाचीही असो, परंतु एक खरा प्रेमी- प्रेमिका नाते वाचवण्यासाठी नेहमी माघार घेतो आणि सॉरी- क्षमस्व बोलतो. एका खऱ्या पार्टनरचे कर्तव्य आहे, की आपापसातील नाते खराब होऊ नये म्हणून कठीण परिस्थितीत माघार घेऊन नमुन जाणे. स्वातंत्र्य देणे: खऱ्या प्रेमात तुम्हाला संपूर्ण स्वातंत्र्य असते. खरे प्रेम एका स्वतंत्र्य पक्ष्याप्रमाणे असते, जो कुठेही उडू शकतो. कधीही निर्बंध लावून खरे प्रेम मिळवले जाऊ शकत नाही. खऱ्या प्रेमात प्रत्येकाला आपले विचार आणि धर्म-कर्म अशा प्रत्येक गोष्टीत स्वातंत्र्य असते. शेजाऱ्या पाजाऱ्यांवर प्रेम करण्यास सांगितले जाते, मग काय त्यांच्याशीही असलेच लंपट उपद्व्याप करा, असाच अर्थ घ्यावा काय?

**गॉड इज लव्ह; लव्ह इज गॉड!**
**सो लव्ह टु ऑल; लव्ह दाय नेबर्स! (पवित्र बायबल)**

कोणत्याही प्राणी, वस्तू, सजीव, निर्जीव इत्यादीबद्धल मनामध्ये आपुलकी, स्नेह, जिव्हाळा, आदर, निर्माण होणे आणि ती गोष्ट सहवासात, जीवनात हवीशी वाटणे म्हणजे प्रेम होय. आपले दैनंदिन जीवन जगत असताना सहवासात येणाऱ्या कोणत्याही गोष्टीशी भावनिक, मानसिक, शारीरिक, संबंध जोडले गेल्यामुळे निर्माण झालेला स्नेह म्हणजे प्रेम होय. मानवाच्या वयोगट व नातेसंबंधांनुसार प्रेमाचे स्वरूप असे असते- १) स्नेह- प्रेमाचा हा प्रकार आपण आपल्याहून वयाने लहान असणाऱ्या व्यक्तीसोबत ठेवतो. यात एक काळजी किंवा माया असते. भूतदया किंवा पशुपक्षांबद्दल वाटणारी आपुलकी हीसुद्धा यात मोडते. २) प्रेम- हा समान वयोगटातील व्यक्तींच्या दरम्यान असणाऱ्या संबंधांना दर्शवितो. याचे उपप्रकार म्हणजे भगिनीप्रेम, बंधुप्रेम, मित्रप्रेम इत्यादी. ३) आदर- हा प्रेमाचा प्रकार आपल्याहून वयाने मोठ्या अथवा ज्येष्ठ व्यक्तींकरता असतो. यातही संबंधित व्यक्तीची वाटणारी काळजी- विशेषतः त्यांच्या आवडी-निवडी व विचारांची ठेवतात. ही वागणूक त्यांच्या जीवनाच्या अनुभवाची आणि त्यांनी आपल्या केलेल्या संगोपनाबद्दलची एक पावती आणि क्वचित प्रसंगी त्यांना आवडणाऱ्या शिस्तबद्ध दिनचर्येची दखल असू शकते, उदा. बहिणभावाचे प्रेम, पितृप्रेम. पण हे सर्व प्रेमच! ४) ममता- हा तो प्रेमप्रकार की ज्याला अनुभवायला असे म्हणतात की देवही अवतार घेतात. गुरुला या मातृ प्रेमामुळेच गुरूमाऊली संबोधन चिकटले. स्त्रीला मातृत्व प्राप्त झाले की आपल्या बाळासाठी वाटणारे प्रेम म्हणजे ममता होय. ५) भक्ती- प्रेमाचे परमोच्च रूप की ज्याचे वर्णन केवळ अशक्य. परमेश्वर आणि साधक जेंव्हा एकरूप होतात तेंव्हा जो प्रेमप्रकार घडतो, तो म्हणजे भक्ती होय. त्यालाच प्रेमाभक्ती असेसुद्धा संबोधले जाते. हीच प्रेमाभक्ती म्हणजेच भक्त व भगवंताची एकरूपता होय. भिन्नता म्हणजे विभक्ती- परमेश्वर आणि भक्त दोघेही एकरूप होऊन आपापले वेगळे अस्तित्व घालवून परमोच्च एकरूपता अनुभवतात त्यासच भक्ती असे संबोधन आहे. ६) एकरुपता- प्रेम म्हणजे दोन जीव, नाते, संबंधी, एकत्र येऊन विचाराची देवाणघेवाण करतात, त्याच्या विचारातील एकता म्हणजे प्रेम होय. उदा.पतीपत्नी प्रेम. स्वार्थ-संधीसाधू व्यक्ती मात्र या पवित्र प्रेम स्वरुपांनाही एकाच पारड्यात तोलतो, प्रेमाला बदनाम करतो आणि सगळा घोटाळा होऊन बसतो. म्हणूनच मानवसमाज अशांची धिंड काढतो.

**प्रेम का जिसने मर्म न जाना वो बन्दा नादान है।**
**ईश्वर ही तो प्रेम है साधो प्रेम स्वयं भगवान है।**
**मतलब पर जो टिका है उसको प्रेम समझना भूल है।**
**प्रेम अगर निष्काम बने तो एक महकता फूल है।**
**(पवित्र सम्पूर्ण हरदेव बाणी: पद क्र.१९८)**

आजच्या काळात जास्तकरून प्रेम शब्दाला स्त्री व पुरुष यांच्या प्रेम प्रसंग- प्रणय यांच्याशी जोडून पाहिले जाते. परंतु प्रेम हे जगातील कोणत्याही वस्तुशी अथवा व्यक्तीशी होऊ शकते. प्रेमाच्या प्रभावानेच सृष्टीतील लोक एक दुसऱ्याची मदत करतात, एक दुसर्याच्या जीवनात सहयोग करता. याशिवायही प्रेमाचे अनेक रूप आहेत. जसे पती पत्नीचे प्रेम, भाऊ बहिणीचे प्रेम, मित्रांचे आपापसातील प्रेम, प्रियकर आणि प्रेयसीचे प्रेम, गुरु आणि शिष्याचे प्रेम इत्यादी इत्यादी. प्रेमाशिवाय मनुष्यजीवन संभव नाही. म्हणूनच प्रेम हेच जीवन आहे, असे म्हटले जाते. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे खरे प्रेम हे नेहमी निस्वार्थ असते, स्वार्थी तर लोक असतात जे त्याला विकृत स्वरूप देतात. आता आपण प्रेमाचे दुसरे रूप म्हणजेच विकृत, वासनांध, प्रणयासक्त प्रेम होय. हे प्रेम मनुष्याचा स्वार्थ आणि अज्ञानामुळे निर्माण होते. या प्रेमाचे दुसरे नाव वासना असते. वासना हीच प्रेमाचे विकृत स्वरूप आहे. खोट्या प्रेमात इच्छा, क्रोध, दुःख आणि निराशा उत्पन्न होते आणि याच भावनांचे दुष्प्रभाव म्हणून अपराध आणि अधर्म यांचा जन्म होतो. हे प्रेम मनुष्याला आपल्या पतनाकडे घेऊन जाते. आज समाजात जे मानवी भावनांमध्ये असंतुलन तयार होत आहे, त्यामागील मुख्य कारण निस्वार्थ प्रेमाची कमतरता- अभाव होय. सामाजिक नात्यांची गोष्ट तर दूरच राहिली, परंतु आजकाल आई-मुलगा, पिता-पुत्री, भाऊ-बहीण, यांचे पवित्र प्रेम- माया, वात्सल्य, सहानुभूती आणि पती-पत्नी यांच्या समर्पण व निस्वार्थ प्रेमातही कमतरता निर्माण झाली आहे. अनेकानेक कारणांमुळे आजकाल प्रत्येक ठिकाणी प्रेमाविषयी तक्रारी ऐकायला येतात. काही लोकांना ईश्वरभक्ती तर काहींना प्रेम या शब्दांचा मोठाच तिरस्कार वाटू लागला आहे. काहींना प्रेम म्हटले की त्याच्या डोळोंडोळी विषयवासनाच दिसते. कारण त्यांना प्रेमाचा खरा अर्थ कधी समजलाच नाही; असे गृहीत धरणेच योग्य!

# जनसेवा फाउंडेशनच्या माध्यमातून नवनागापूर येथे संपन्न झालेल्या कार्यक्रमाला महिलांची अफाट गर्दी

## अजय अतुल यांच्या झिंगाट गाण्यावर सुजय विखेंनी धरला ठेका




**अहमदनगर । प्रतिनिधी**

काल नगर तालुक्यातील नवनागापूर येथे जनसेवा फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेला कर्तृत्ववान महिलांचा सन्मान सोहळा आणि सांस्कृतिक महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा झाला. या कार्यक्रमासाठी महिलांनी उत्स्फूर्तपणे दर्शविलेल्या सहभागाने परिसर अगदी फुलून गेला होता. इतकी अफाट आणि मोजता न येणारी महिला भगिनींची संख्या पाहून एखाद्या भव्य पर्वाचीच अनुभूती सर्वांना झाली. या कार्यक्रमात खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला. यावेळी सुजय विखेंनी या सर्व महिलांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या उत्कृष्ट कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी दिग्गज संगीतकार व अजय अतुल या जोडीने उपस्थित महिलांना आपल्या गाण्यावर ताल धरण्यात भाग पाडले. तसेच अभिनेत्री सोनाली कुलकर्णी आणि मानसी नाईक यांनी आपल्या नृत्याने उपस्थितांचा उत्साह वाढविला. या सांस्कृतिक महोत्सवात महिलांचे मनोरंजन करण्याच्या अनुषंगाने आयोजित या कार्यक्रमांव्यतिरिक्त भव्य लकी ड्रॉ स्पर्धा देखील आयोजित करण्यात आली होती. यामध्ये महिलांना पैठणीसह विविध आकर्षक बक्षिसे देखील देण्यात आली. या कार्यक्रमात महिला संघटन करणाऱ्या अरुणाताई नानाभाऊ कांबळे, सामाजिक कार्यकर्त्या डॉ. अर्चना नांगरे आघाव, कीर्तनाच्या माध्यमातून समाजप्रबोधन करणाऱ्या ह.भ.प. उज्वलाताई ठोंबरे, श्रीराम विद्यालय, राळेगण येथे मुख्याध्यापिका या पदावर उत्कृष्ट कार्य करणाऱ्या तारका रंगनाथ भापकर, शिवव्याख्याता प्रणालीताई बाबासाहेब कडूस, कोविड काळात उत्कृष्ट सेवा देणाऱ्या डॉ. निवेदिता माने, अंगणवाडी सेविका विद्या दुसुंगे, युवा वैज्ञानिक श्रुतिका धनंजय दळवी, शिक्षिका सविता मधुकर बोरकर, महिला संघटन करणाऱ्या अनिता आदिनाथ बनकर, महिला सक्षमीकरणासाठी भरीव योगदान देणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या सिंधू राजेंद्र वाणी, सोनाली योगेश गहिले, स्मिता मंगेश करडे, सुमन साहेबराव सप्रे, मिराबाई ज्ञानदेव शेळके, लाकडी घाण्यावरून तेल काढण्याचा व्यवसाय सुरू करून अनेक महिलांना रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या अश्विनी कोळपकर, गृह उद्योग सुरू करणाऱ्या मिना बेरड, जगदंबा महिला स्वयंसहायताच्या माध्यमातून महिलांना रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या मिना गणेश काटे, सोनुबाई विजय शेवाळे, कोमल वाकळे, प्रणाली बाबासाहेब कडुस आदी कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला.

# जळोली जिल्हा परिषद शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजर



**सांगोला । प्रतिनिधी**

जळोली येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात साजरे झाले.सुरुवातीला गटशिक्षणाधिकारी मारुती लिगाडे साहेब सरपंच ज्योतीराम मदने उपसरपंच सौ.विमल थोरात शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष बाळासाहेब (आण्णा) नरसाळे उपाध्यक्ष शहाजी नरसाळे संचालक दत्तात्रय नरसाळे, समाधान कांतिलाल आण्णा नरसाळे, नरसाळे, बिभीषण शिरसट,महेश नरसाळे, सोमनाथ कोळेकर,रमेश थोरात,रविंद्र नरसाळे, मुख्याध्यापक गणपत मोरे यांच्या शुभहस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून स्नेहसंमेलनाला सुरुवात झाली.यावेळी १६५ इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थी विद्यार्थिनी आपली कला आदर्श शिक्षिका देवकी कलढोणे -दुधाणे यांच्या मार्गदर्शनाखाली सादर करत एकसे बढकर एक सादरीकरण करत पालकांच्या डोळ्यांचे पारणे फेडले.त्यामध्ये रखुमाई रखुमाई,मेरे पापा ,गोरी गोरी पान, मराठी रिमिक्स,लखख पडला प्रकाश,भीमाची वाघीण रणरागिणी, शंकरा रे शंकरा, कोळी गीते, छत्रपती शिवाजी महाराजांच्या वरील राज आलं,नहीं मिलेगा असा घागरा,विनोद,विनोदी बातम्या ,नाटिका,सादर करत विविध गाण्यांचा माध्यमातून विद्यार्थ्यांनी ठेका धरत आपली कला सादर केली.आणि पालकांनी ही उत्सुर्तपणे प्रतिसाद देत बक्षिसांचा वर्षाव केला.यावेळी शिक्षक समितीचे तसेच शिक्षक संघाचे पदाधिकारी यांनी भेट देऊन शाळेचा सन्मान केला.अतिशय नियोजन बद्ध पध्दतीने स्नेहसंमेलन संपन्न होत असताना प्रास्ताविक मुख्याध्यापक गणपत मोरे यांनी केले.तर आदर्श शिक्षिका देवकी कलढोणे -दुधाणे यांनी विशेष परिश्रम घेतले.सुत्रसंचलन जयवंत कापसे. सोमनाथ पवार यांनी केले तांत्रिक संयोजन शिवाजी गोरे,कैलास नरसाळे यांनी काम पाहिले तर आभार रमेश खारे यांनी मानले.स्नेहसंमेलन यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक बांधवांनी आणि पालकांनी विशेष परिश्रम घेतले.

# सांगोल्यात कलबुर्गी-कोल्हापूर रेल्वेला दाखवला हिरवा झेंडा

**सांगोला । प्रतिनिधी**

प्रवाशांची मागणी लक्षात घेवून खासदार रणजितसिंह निंबाळकर यांच्या पाठपुराव्यामुळे कलबुर्गी - कोल्हापूर रेल्वेला सांगोल्यात थांबा मंजूर करण्यात आला आहे. सोमवार ११ मार्च रोजी सकाळी ११ वाजता सांगोल्यात कलबुर्गी-कोल्हापूर रेल्वेला राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दीपकआबा साळुंखे पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत, युवासेना उपजिल्हाप्रमुख सागर पाटील, स्टेशन मास्तर गंगाकुमार सिंह यांनी हिरवा झेंडा दाखवला.

कलबुर्गी - कोल्हापूर ही रेल्वे सुरू झाल्यानंतर प्रवाशांची संख्या वाढली होती. मात्र, या रेल्वेला सांगोला रेल्वे स्थानकात थांबा नसल्याने सांगोल्यासह आसपासच्या परिसरातील प्रवाशांची गैरसोय होत होती. प्रवाशांची मागणी लक्षात घेवून कलबुर्गी - कोल्हापूर रेल्वेला सांगोला स्थानकात थांबा मिळावा यासाठी खासदार रणजितसिंह निंबाळकर यांच्याकडे भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी वारंवार पाठपुरावा केला होता. त्यानंतर खासदार निंबाळकर यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री आश्विनी वैष्णव यांच्याकडे पत्रव्यवहार करून पाठपुरावा केला होता. या पाठपुराव्याला यश आले असून केंद्रीय रेल्वेमंत्री आश्विनी वैष्णव यांनी कलबुर्गी - कोल्हापूर रेल्वेला सांगोला रेल्वे स्थानकात थांबा देण्याचे निर्देश रेल्वेच्या अधिकाऱ्यांना दिले होते. रेल्वे मंत्रालयाचे संयुक्त निदर्शक विवेककुमार सिन्हा यांनी कलबुर्गी - कोल्हापूर रेल्वेला सांगोला रेल्वे स्थानकात थांब्याला मंजुरी दिली असल्याचे प्रसिद्धी पत्रकाद्वारे जाहीर केले. त्यानुसार सोमवार ११ मार्च रोजी सकाळी ११ वाजता सांगोल्यात कलबुर्गी-कोल्हापूर रेल्वेला राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दीपकआबा साळुंखे पाटील भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत, युवासेना उपजिल्हाप्रमुख सागर पाटील, (ADI पंढरपूर ) जानार्धन प्रसाद, (TI पंढरपूर ) अशोक श्रीवास्तव, स्टेशन मास्तर गंगाकुमार सिंह यांनी हिरवा झेंडा दाखवला. यावेळी मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी, तालुका कृषी अधिकारी शिवाजी शिंदे, भाजप तालुकाध्यक्ष दुर्योधन हिप्परकर, भाजप तालुकाध्यक्ष अतुल पवार, संभाजी आलदर, शिवाजी गायकवाड, नवनाथ पवार, विजय बाबर, बाळासाहेब आसबे, पप्पू पाटील,वसंत सुपेकर,दिलीप सावंत, विलास होनमाने, नीलकंठ शिंदे, दीपक चोथे, मानस कमलापूरकर, प्रवीण जानकर, बंडू केदार, सोयजीत केदार, संजय केदार,यांच्यासह आपुलकी प्रतिष्ठान सदस्य, शहीद अशोक कामटे संघटनेचे सदस्य, शहीद जवान बहुउद्देशिय संघटनेचे सदस्य, प्रवाशी संघटनेचे सदस्य उपस्थित होते. यावेळी अनेकांनी पंढरपूर ते मुंबई गाडी सातही दिवस सुरू करावी तसेच ती गाडी सांगोला येथून सुरू करावी अशी मागणी केली.

सह्याद्रीचा राखणदार



# मूल नगरीत पार पडला दिमाखदार पुरस्कार वितरण सोहळा

## जागतिक महिला दिना निमित्त १२ कर्तृत्ववान महिलांना राष्ट्रीय लोकहित सेवाचा सन्मान पुरस्कार बहाल

**मूल । प्रतिनिधी**

कला,क्रीडा,साहित्यिक,शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात विशेष व उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या बारा कर्तृत्ववान महिलांना राष्ट्रीय लोकहित सेवाच्या वतीने मूल स्थित दर्पण वाचनालय,पत्रकार भवन येथे दुपारी बारा वाजता जागतिक महिला दिना निमित्त सन्मान पुरस्काराने मान्यवरांच्या उपस्थितीत गौरविण्यात आले.आयोजित समारंभाचे अध्यक्षस्थान चंद्रपूरच्या सुपरिचित अधिवक्ता पुनम वाघमारे यांनी विभूषित केले होते तर विशेष अतिथी म्हणून महाराष्ट्रातील नामवंत महिला सहज सुचलं व्हॉट्सअप गृपच्या मुख्य मार्गदर्शिका तथा राजूराच्या जेष्ठ साहित्यिक अधिवक्ता मेघा धोटे , सावलीच्या सुपरिचित कवयित्री शैला चिमड्यालवार यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभली होती.याच कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून नागपूर निवासी कर्जमुक्ती अभियानाच्या गिता मेहर उपस्थित होत्या.

उल्लेखनीय कामगिरीसाठी देण्यात येणारा हा पुरस्कार सहज सुचलंच्या कर्तृत्ववान महिलांसाठी खास असल्याचे अधिवक्ता मेघा धोटे यांनी आपल्या भाषणातून आवर्जून सांगितले.कर्जमुक्ती अभियानात महिलांनी पुढाकार घेण्याचे आवाहन गीता मेहर यांनी केले तर अधिवक्ता पुनम वाघमारे यांनी आपल्या भाषणातून कायदे विषयक बाबत मोलाचे मार्गदर्शन या वेळी केले.राष्ट्रीय लोकहित सेवाचा हा सन्मान पुरस्कार प्राप्त करणा-यांत प्रामुख्याने चंद्रपूरच्या महिला सामाजिक कार्यकर्त्या तथा महाराष्ट्रातील नामवंत सहज सुचलं व्हॉट्सअप गृपच्या मुख्य संयोजिका रंजू दिलीप मोडक, विदर्भातील सुपरिचित कवयित्री तथा योगा शिक्षिका वैजयंती विकास गहुकर, दुर्गापूर- चंद्रपूरच्या मधूर व गोड आवाजाच्या गायिका उज्वला पद्माकर निमगडे,मूल तालुक्यातील चिरोली येथील आशा वर्कर श्रीमती पौर्णिमा राजेश कीर्तीवार,सामाजिक कार्यात सदैव अग्रेसर असणाऱ्या भद्रावती व्हॅर्चुअस मल्टीपर्पज सोसायटी भद्रावतीच्या संस्थापक अध्यक्ष कु. किरण विजय साळवी , शैक्षणिक क्षेत्रात प्रगतीच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या भद्रावती तालुक्यातील शेगांव खूर्द येथील कु.प्रियंका पांडुरंग गायकवाड, पुण्यातील महिला पत्रकार कु. स्नेहा उत्तम मडावी मूल तालुक्यातील चिखलीच्या महिला पोलिस पाटील पुनम सुभाष मडावी,चंद्रपूर जिल्ह्याच्या अतिदुर्गम भागातील राजूरा येथील योगा शिक्षिका तथा सुपरिचित समाजसेविका सरोज विठ्ठलराव हिवरे,ठाणे जिल्ह्यातील शहापूरच्या सामाजिक महिला कार्यकर्त्या चैताली निलेश आत्राम, बाळापूर तळोधी येथील प्राथमिक स्वास्थ्य आरोग्य केंद्रातील ज्योती संजय इंगळे,व सोलापूर येथील प्रख्यात चित्रकार रश्मी गजानन पचारे यांचा समावेश होता.उल्लेखनीय कामगिरी साठी मला मिळालेला हा पुरस्कार हा तरं खरं माझा नाही महाराष्ट्रातील नामवंत सहज सुचलं महिला व्हॉट्सअप गृपच्या मुख्य मार्गदर्शिका मायाताई कोसरे व मेघाताई धोटे यांचा आहे.सामाजिक कार्य करतांना



त्यांच्या कडून आज पर्यंत मला बरंच काही शिकायला मिळाल.वेळोवेळी सामाजिक कार्य करण्याचं प्रोत्साहन त्यांच्या कडून मिळाल अश्या शब्दात सन्मान पुरस्कार स्वीकारल्यानंतर सहज सुचलं व्हॉट्सअप गृपच्या मुख्य संयोजिका रंज्जू दिलीप मोडक यांनी बोलताना आपली प्रतिक्रिया दिली.गेल्या काही वर्षांपासून सहज सुचलं काव्यकुंजच्या माध्यमातून माझ्या स्वलिखीत काव्यरचना प्रकाशित झाल्या .मेघाताईने मला प्रोत्साहित केले.व आज एक उत्तम कवयित्री म्हणून पुरस्कार मिळाला याचा अतिशय मला आनंद झाला अश्या शब्दात या प्रतिनिधीशी बोलताना त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.तर प्रियंका गायकवाडने सहज सुचलं मुळे आपणांस वेळोवेळी मार्गदर्शन मिळाल्याची प्रतिक्रिया दिली विशेषतः रंज्जू मोडक यांच्या नावाचा तिने आपल्या बोलण्यातून स्पष्ट उल्लेख केला.आयोजक दत्तात्रय समर्थ व अर्चनाताई समर्थ यांनी माझ्या कार्याची दखल घेत मला हा सन्मान पुरस्कार बहाल केला असल्याची भावना दिव्यांग उज्वला निमगडे यांनी व्यक्त केली.कार्यक्रम स्थळी उपस्थितीतांनी पुरस्कार प्राप्त ग्रामीण भागातील शिक्षण क्षेत्रात प्रगतीच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या प्रियंका गायकवाड यांचे तोंडभरून कौतुक केले तर अनेकांनी चित्रकार रश्मि पचारे यांचे अभिनंदन केले.पत्रकार भवनात आयोजित या कार्यक्रमाला प्रामुख्याने चंद्रपूरच्या सुपरिचित कवयित्री सविता कोट्टी -सातपूते,फर्जना शेख,श्यामला बेलसरे,समता बन्सोड, राधिका बुक्कावार ,सीमा भसारकर,संगिता पाटील,अश्विनी कावलकर,किर्ती शहाने,नाजूका लाटकर,नझिमा महाजन, वाईजा अन्वर शेख,शकीला शेख,शमा शेख सारिका निमगडे यांच्या सह तालुक्यातील महिला व तरुणी उपस्थित होत्या.विशेषता पुरस्कार प्राप्त कर्तृत्ववान महिलांच्या परिवारातील सदस्य या पुरस्कार सोहळ्यात सहभागी झाले होते.अनेकांनी राष्ट्रीय लोकहित सेवाने यंदाच्या वर्षात आरंभ केलेल्या या कार्यक्रमाचे आयोजक राष्ट्रीय लोकहित सेवाचे चंद्रपूर जिल्हा कार्याध्यक्ष दत्तात्रय समर्थ व त्यांच्या अर्धांगिनी सामाजिक महिला कार्यकर्त्या अर्चना समर्थ यांचे अभिनंदन केले.चार तास रंगलेल्या या दिमाखदार पुरस्कार सोहळ्याचे सुरेख संचालन मूल नगरीच्या सुपरिचित सामाजिक महिला कार्यकर्त्या तथा सहज सुचलंच्या सहसंयोजिका नलिनी आडपवार व दिलीप गेडाम यांनी केले.

# हिंगणघाट विधानसभा क्षेत्रातील सेलू तालुक्यातील परसोडी व दिग्रस गावांतील शेकडो कार्यकर्त्यांनी केला भाजपात प्रवेश

## आ.समिर कुणावार यांचे प्रमुख उपस्थितीत स्वीकारला भाजपाचा शेला

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

हिंगणघाट विधानसभा क्षेत्रात दिवसेंदिवस भाजपाचा मोठया प्रमाणात विस्तार होत असून विधानसभा क्षेत्रातील नागरीक, युवा कार्यकर्ते आ.समिर कुणावार यांचे नेतृत्वावर विश्वास व्यक्त करीत मोठया प्रमाणात भारतीय जनता पक्षात प्रवेश करीत आहेत.आज दि. १२ रोजी हिंगणघाट विधान सभा क्षेत्रातील सेलू तालुक्यातील परसोडी व दिग्रस गावातील बहुसंख्य युवा कार्यकर्त्यांनी आ. समीर कुणावार यांचा विधानसभा क्षेत्रातील लोकाभिमुख विकास तसेच कार्यसम्राट आमदार यांची कार्यशैली पहाता मोठ्या संख्येने भाजपात प्रवेश केला.



सदर प्रवेश सोहळ्याचे आयोजन दि. १२ मार्च रोजी आ. समीर कुणावार यांच्या हिंगणघाट येथील स्थानिक जनसंपर्क कार्यालयात करण्यात आले.याप्रसंगी प्रामुख्याने भूषण उगेमुगे ,विजय चन्ने ,पुंडलिकराव फटिंग , मारोतराव पांगुळ, मंगेश उगेमूगे , विनोद चंद्रावल, सुनील युवनाते, श्रीरामजी पांगुळ, संजय धुर्वे , ज्ञानेश्वर पंधराम, सदाशिव मरापे, महादेव मरापे, रमेश पांगुळ, नामदेव मरापे, संजय कोपरकर, मुकेश कुंबरे, स्वप्नील ईरपाते , शंकर वरखडे , पांडुरंग आत्राम, दिनेश ईरपाते ईत्यादी कार्यकर्त्यांना भाजपात रितसर प्रवेश देण्यात आला. उपरोक्त कार्यक्रम आमदार समीर कुणावार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.सदर कार्यक्रमाचे वेळी आ.समीर कुणावार यांचेसह भाजपा जिल्हा उपाध्यक्ष किशोर दिघे, जिल्हा महामंत्री भाजपा आकाश पोहाणे, भाजपा समुद्रपूर तालुका अध्यक्ष वामन चंदनखेडे, शंकरराव मुंजेवार, अमोल गवळी, प्रवीण शिर्शीकर, बालू इंगोले, समाजसेवक सुनील डोंगरे इत्यादी भाजपा पदाधिकारी तसेच जेष्ठ कार्यकर्ते उपरोक्त पक्षप्रवेश सोहळ्यास उपस्थित होते.

## मुलींच्या गटात अमरावती संघाची बाजी

# आमदार सुधाकर अडबाले यांच्या पुढाकाराने राज्यस्तरीय आमंत्रित हॉकी स्पर्धा (मुली)

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आमदार सुधाकर अडबाले यांच्या पुढाकाराने चंद्रपुरात थाटात पार पडलेल्या 'आमदार चषक' राज्यस्तरीय आमंत्रित हॉकी स्पर्धेत मुलींच्या गटात अंतिम सामन्यात नागपूर संघाचा ३-१ ने पराभव करीत अमरावती संघाने बाजी मारली.

हॉकी प्रमोटर असोसिएशन चंद्रपूर व डेव्हलपमेंट न्ड रिसर्च एज्युकेशन सोसायटी (ड्रिम) चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आमदार सुधाकर अडबाले यांच्या पुढाकाराने राज्यस्तरीय आमंत्रित हॉकी स्पर्धा (मुली) लोकमान्य टिळक हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय, जिल्हा स्टेडीयमच्या बाजूला चंद्रपूर येथे पार पडली. या स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातून मुलींचे संघ सहभागी झाले होते.मुलींच्या गटात नागपूर आणि अमरावती संघात अंतिम सामना रंगला. अतिशय




चुरशीच्या सामन्यात अमरावती संघाने नागपूर संघाचा ३-१ ने पराभव केला. तर तिसऱ्यास्थानासाठी चंद्रपूर - यवतमाळ संघात सामना झाला. यात चंद्रपूर संघाने बाजी मारली.मुलींच्या गटात प्रथम, द्वितीय व तृतीय विजेत्या संघाला ट्राफी, रोख आणि मेडल देऊन आमदार सुधाकर अडबाले यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. तर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या बेस्ट स्कोरर, बेस्ट किपर, बेस्ट फॉरवर्ड, बेस्ट डिपेंडर, बेस्ट प्लेअर ऑफ फायनल मॅच, बेस्ट प्लेअर ऑफ द टुर्नामेंट म्हणून खेळाडूंना गौरविण्यात आले.यावेळी अरविंद दिक्षीत, सुरेंद्र अडबाले, प्रा. रवी झाडे, दिनकर अडबाले, सचिन मोहीतकर, प्रेम गावंडे, रुपेशसिंह चौव्हाण, अभिजीत दुर्गे, निलेश शेंडे, पंकज शेंडे आदींची उपस्थिती होती.

# पायोनियर स्कूल य.मंगेवाडी येथे महिला दिन विविध उपक्रमांनी साजरा

**सांगोला । प्रतिनिधी**

खंडोबा बहुउद्देशीय संस्थेच्या पायोनियर इंग्लिश , सेमी इंग्लिश मिडीयम स्कूल व पायोनियर निवासी गुरुकुल मध्ये जागतिक महिला दिनानिमित्त विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.स्वतःच्या इच्छा व अपेक्षांना मुरड घालून निरंतर आपल्या कुटुंबाची जबाबदारी समर्थपणे सांभाळणारी आपली आई , बहीण , मावशी , काकी अशा विविध रूपात पुरुषांच्या मागे खंबीरपणे उभी राहून संसाराचा रथ सक्षमपणे हाकनारी नारीशक्ती तिचा सन म्हणजेच जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने य. मंगेवाडी पंचक्रोशीतील महिला मोठ्या संख्येने पायोनियर स्कूलमध्ये एकत्र जमल्या होत्या.प्रमुख पाहुणे म्हणून महिला पोलीस कॉन्स्टेबल सौ. आशाताई येलपले (लोकरे ) मॅडम मुंबई , संस्थेच्या संचालिका सौ. मनीषा येलपले मॅडम , य मंगेवाडी सरपंच सौ. प्रीती जावीर व बापुसो जावीर , माजी सरपंच सौ. सखुबाई मासाळ , अजनाळे गावच्या सरपंच सौ. आरती कोळवले मॅडम इत्यादींची प्रमुख उपस्थिती होती.प्रापंचिक धावपळीतून थोडासा वेळ काढून विरंगुळा म्हणून महिला पालक पायोनियर स्कूल ने आयोजित केलेल्या विविध स्पर्धेमध्ये सहभागी झाल्या होत्या.संगीत खुर्ची , दोर चढने , रनिंग , तळ्यात मळ्यात , गोळा



फेक ,पाककला स्पर्धेसाठी आकर्षक सजावट करून निरनिराळे स्वादिष्ट व रुचकर पदार्थ महिलांनी बनवून आणले होते .फॅशन शो मध्ये महिला बंगाली , राजस्थानी , आदिवासी , शेतकरी कन्या , पंजाबी वेस्टर्न विविध प्रांतातील विभिन्न पोशाख परिधान करून आपल्या भारतीय संस्कृतीला जवळून पाहण्याची संधी उपस्थित प्रेक्षकांना मिळाली. ४०० मी रनिंग मध्ये प्रथम क्रमांक काजल कंड्रे यांनी मिळविला द्वितीय क्रमांक मनीषा ठेंगल यांनी तरी तृतीय क्रमांक सादवी येलपले यांनी मिळविला.लांबउडी मध्ये प्रथम क्रमांक अमृता येलपले यांनी मिळविला द्वितीय क्रमांक सादवी येलपले तर तृतीय क्रमांक काजल कंड्रे यांनी मिळविला.फॅशन शो मध्ये प्रथम क्रमांकऋणाली कोळवले , द्वितीय क्रमांक सीमा कोळवले तर तृतीय क्रमांक आरती कोळवले यांनी मिळविला. कुकिंग मध्ये प्रथम क्रमांक निर्मला विठ्ठल येड्रावकर , द्वितीय क्रमांक अमृता येलपले , तृतीय क्रमांक आरती कोळवले यांनी मिळविला.दोर चढणे या क्रिडाप्रकारात प्रथम क्रमांक काजल कंड्रे यांनी मिळविला द्वितीय क्रमांक तसलीम मुलानी यांनी तर तृतीय क्रमांक सादवी येलपले मिळविला. तळ्यात मळ्यात स्पर्धेत प्रथम रुपाली येलपले , द्वितीय कविता लाडे तृतीय वनिता सुर्यवंशी. गोळाफेक मध्ये प्रथम रुपाली येलपले द्वितीय कविता करमुडे , तृतीय क्रमांक साधना ठेंगल यांनी मिळविला .संगीत खुर्ची मध्ये वनिता सुर्यवंशी प्रथम , वर्षा ढोले द्वितीय क्रमांक तर तृतीय क्रमांक पुष्पा येलपले यांनी मिळविला.विजेत्या स्पर्धकांना पारितोषिके व प्रशस्तीपत्रक देऊन सन्मान करण्यात आला.पायोनियर शाळेत प्रत्येक सन , उत्सव साजरे करून संस्कृतीची जोपासना केली जाते.केवळ शैक्षणिक विकास न साधता सामाजिक , संस्कृतिक उपक्रमाव्दारे आपल्या परंपरा जपून सामाजिक , शैक्षणिक , सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी प्रयत्न केला जातो. मुख्याध्यापक अनिल येलपले सर व सर्व विभाग प्रमुख , शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या परिश्रमाने जागतिक महिला दिनाचा कार्यक्रम यशस्वी झाला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिमाखदार व अलंकारिक भाषेत आशुतोष रूपनर सर आणि रणदिवे मॅडम केले. तर आभार राऊत मॅडम यांनी मानले. कार्यक्रमासाठी महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

# रमजान महिन्यात भारनियमन रद्द करण्याची मागणी

**चारठाणा । प्रतिनिधी**

चारठाणा येथे दररोज सकाळी तिन तास भारनियमन घेतले जात आहे दरम्यान १२ मार्च पासुन मुस्लीम बांधवाचा पवित्र रमजान महिन्यास प्रारंभ होत असून नागरीकांची गैरसोय लक्षात घेता भारनियमन तात्काळ रद्द करण्याची मागणी एका निवेदनाव्दारे तहसीलदार जिंतूर यांच्याकडे करण्यात आली आहे.

चारठाणा येथे दररोज सकाळी साडेपाच ते साडेआठच्या दरम्यान तिन तास विनाकारण भारनियमन लादून विद्युत वितरण कंपनी लोकांना वेठीस धरत असल्याने नागरीकांना नाहक गैरसोयीचा सामना करावा लागत असून महावितरणच्या संबधित लोकांमध्ये नाराजीचा सुर व्यक्त होत आहे दरम्यान असे असले तरी सध्याला मुस्लीम बांधवाच्या रमजान महिन्याला १२ मार्च पासून प्रारंभ होत असुन या महिन्यात




मुस्लीम बांधव महिनाभर उपवास (रोजा ) करीत असतात दरम्यान याप्रकरणी त्वरीत उपाययोजना करून भारनियमन बंद करण्याची मागणी तहसीलदार जिंतूर यांची एका शिष्टमंडळानी भेट घेऊन भारनियमन बंद करण्याची मागणी केली आहे .

सदर निवेदनावर हाफेज मुबारक काझी,सलिमोद्दीन काझी,असगर देशमुख,जलील इनामदार,कॉंग्रेसचे सरचिटणीस प्रदिप देशमुख,इरशाद पाशा पिंपरीकर,सिद्दीक शेख,विजय रामपुरकर,अविनाश मस्के आदींच्या स्वाक्षर्या आहेत.

# नृसिंह मंदिर येथे शिवरात्री निमित्ताने दिपउत्सव साजरा

**चारठाणा । प्रतिनिधी**

जिंतूर तालुक्यात असलेल्या चारठाणा येथे अनेक पुरातन मंदिरे आहेत. हेमाडपंती बांधकाम असलेल्या या मंदिरात वर्षभर भाविकांची वर्दळ असते.

जिंतूर तालुक्यात चारठाणा हे धार्मिक स्थळ आहे. शिवमंदिर असलेले चारूक्षेत्र (चारठाणा) हे हेमाडपंती मंदिराने वसलेली मराठवाड्यातील ऐतिहासिक धार्मिक व भक्तीचा समृद्ध वारसा लाभलेले गाव आहे. चारूक्षेत्र नगरी (चारठाणा) येथे हेमाडपंती शिवमंदिर, गोकुळेश्वर, काशीविश्वेश्वर, श्री नृसिंहतीर्थ मंदिर, दगडी बांधकाम असलेली अष्टकोनी बारव, झुलता मनोरा ही महत्त्वाची स्थळे आहेत.श्री नृसिंहतीर्थ शिवमंदिर : गावाच्या पश्चिमेस असलेल्या चारुशयना



नदीच्या किनाऱ्यावर नृसिंहतीर्थ मंदिर आहे.भाविकाचे श्रद्धास्थान असलेल नृसिंह मंदिरात शिवरात्री निमित्ताने भाविकांच्या वतीने दिपउत्सव साजरा करण्यात आला.या मध्ये ज्योती मॅडम तमशेटे,वंदना तमशेटे,वर्षा तमशेटे, गोदावरी खके,पुनम तमशेटे, प्रतिभा खके, मयूर तमशेटे, तुषार तोडकर, संदेश भुते, प्रल्हाद पातरफळे, नागेश गजमल, अशोक मुंजे, संदीप क्षिरसागर, यांच्यासह अनेक भाविकांनी परिश्रम घेतले आहे.

# पोंभुर्णा येथे ४२ कोटी ९२ लक्ष रुपयांच्या विकासकामांचे लोकार्पण व भूमिपुजन

## पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यामुळे पोंभुर्णा तालुका विकासात अग्रेसर

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील पोंभुर्णा येथे डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी वाचनालय, भुमी अभिलेख कार्यालय आणि दुय्यम निबंधक कार्यालयाचे लोकार्पण तसेच आदिवासी मुला-मुलींच्या शासकीय वसतीगृहाच्या भूमिपुजनासह तालुक्यातील आठ पुलांचा पायाभरणी सोहळा राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा चंद्रपूर जिह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते पार पडला.



कार्यक्रमाला गडचिरोली - चिमूर लोकसभा क्षेत्राचे खासदार अशोक नेते, माजी भाजपा जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे, भाजयुमो जिल्हाध्यक्ष महेश देवकते, प्रदेश सचिव आशिष देवतळे,माजी भाजपा जिल्हा महामंत्री नामदेव डाहुले, माजी जिल्हा परिषद सदस्य राहुल संतोषवार,पोंभुर्णाच्या सरपंचा सुलभाताई पिपरे, उपाध्यक्ष अजित मंगळगिरीवार,सा.बा. विभागाचे कार्यकारी अभियंता मुकेश टांगले, भुमी अभिलेख विभागाचे जिल्हाअधिक्षक भूषण मोहिते, सह. जिल्हा निबंधक अंकिता तांदळे, नगर पंचायतीचे मुख्याधिकारी विकास जिडगलवार, उपभियंता नितीन मुत्त्यलवार, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी वाचनालयाचे सचिव अनिल बोरगमवार, कोषाध्यक्ष राजीव गोलीवार, विनोद देशमुख, अजय मस्के,गुरुदास पिपरे, दर्शन गोरंतीवार आदी उपस्थित होते. यावेळी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले, येथील नागरिकांनी या क्षेत्राचा विकास करण्याचे दायित्व माझ्यावर सोपविले आहे. कधी नव्हे इतका निधी पोंभुर्णा तालुक्याच्या विकासाकरीता खर्च करण्यात आला आहे. आज येथे ४२ कोटी ९२ लक्ष रुपये खर्च करून विविध कार्यालयाचे लोकार्पण, आदिवासी मुला-मुलींच्या वसतीगृहाचे भूमिपुजन आणि पाणंद रस्त्यावरील आठ पुलांच्या बांधकामाची पायाभरणी करण्यात आली आहे. यापूर्वीसुध्दा पोंभुर्णा येथे संत शिरोमणी जगनाडे महाराज सभागृह, महात्मा ज्योतिबा फुले सभागृह आणि वीर शहीद बाबुराव शेडमाके यांचे सभागृह बांधण्यात आले आहे.पुढे ना.मुनगंटीवार म्हणाले, कमी लोकसंख्या असतांनासुध्दा पोंभुर्णा तालुक्यात विकासाची अनेक कामे करण्यात आली आहे. नगर पंचायतीच्या रस्त्यांकरीता तसेच ड्रेनेजसाठी पुन्हा ६ कोटी ४० लक्ष रुपये उपलब्ध करून दिले आहे. राज्यातील सर्वात जलद विकास बल्लारपूर क्षेत्राचा झाल्याचा आनंद आहे. यापुढेही पूर्ण शक्तीने विकास कामे करण्याकरीता आपण कटिबध्द आहोत, अशी ग्वाही यावेळी त्यांनी दिली.

### पोंभुर्णा तालुक्यात या विकासकामांचे झाले लोकार्पण भुमिपूजन आणि पायाभरणी :

**पोंभुर्णा येथे डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी वाचनालयाचे लोकार्पण (८० लक्ष), भूमी अभिलेख कार्यालय लोकार्पण (१ कोटी ८६ लक्ष), आणि पोंभुर्णा येथे दुय्यम निबंधक कार्यालयाचे लोकार्पण (१ कोटी १४ लक्ष), आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृहाचे बांधकाम करणे (१३ कोटी ५४ लक्ष), आदिवासी मुलींची शासकीय वसतीगृहाचे बांधकाम करणे (१३ कोटी ५४ लक्ष), यासह पोंभुर्णा तालुक्यातील चेक हत्तीबोडी ते बोर्डा बोरकर येथील स्मशानभूमी जवळ नाल्यावर पुलाचे बांधकाम करणे, घनोटी नं. १ ते आंबईकडे जाणाऱ्या रस्त्यावर नाल्यावर पुलाचे बांधकाम, घनोटी नं. २ ते आंबेधानोरा येथील मोठया नाल्यावर पुलाचे बांधकाम, सातारा भोसले ते बालाजी तलावपर्यंत जाणाऱ्या मार्गावर पुलाचे बांधकाम, बोर्डा दीक्षित ते बोर्डा झुल्लुरवार रोडारील नाल्यावर पुलाचे बांधकाम, सातारा भोसले स्मशानभूमी ते बालाजी तलावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर पुलाचे बांधकाम, जामखुर्द ते जानाळा रोडवर पुलाचे बांधकाम, दिघोरी ते वेळवा मध्ये लहान पुलाचे बांधकाम करणे याप्रमाणे प्रत्येकी १ कोटी ५० लक्ष रुपये प्रति पूल असे एकूण १२ कोटी रुपयांच्या पुलाचे बांधकाम भुमिपूजन करण्यात आले.**

# लिनेस क्लब पुलगावचा वृद्धाश्रमात महिला दिवस

**वर्धा । प्रतिनिधी**

लिनेस क्लब पुलगावने वृद्धाश्रमात वृद्धांच्या सान्नीध्यात महिला दिवस साजरा केला.आजच्या कुटुंब व्यवस्थेत वृद्धांना घरापासून वृद्धाश्रमात राहावे लागते, ही समाजाची शोकांतिका आहे. घरातील जेष्ठांची सेवा करणे, हे मुलांचे व सुनांचे कर्तव्य आहे. भविष्यात आपल्यावर वृद्धाश्रमात राहायची पाळी येऊ नये. यासाठी येथील वृद्धांचे जीवन अनुभवावे व आपले वर्तन करावे, यासाठी वृद्धाश्रमात महिला दिवस साजरा करत आहोत.असे विचार ऍक्टिव्ह लिनेस क्लबच्या अध्यक्ष शिल्पा जाधव यांनी व्यक्त केले.



वृद्धाश्रमात वृद्धांना जेवणाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले .या कार्यक्रमाला सर्व क्लब च्या महिला सदस्य उपस्थित होत्या. सगळ्यांनी त्यांच्याशी चर्चा करून त्यांचे सुख दुःख समजून घेण्याचा प्रयत्न केला. त्यानी आपल्या आयुष्याच्या काही प्रसंग सांगितले ते ऐकून आमच्या डोळ्यात पाणी आले. आम्हांला त्याचा सोबत चर्चा करून खूप शिकायला मिळाल्याचे क्लब सदस्यांनी सांगितले . सर्व क्लब च्या सदस्यांनी त्यांना जेवण दिले. या कार्यक्रमाला क्लबच्या सर्व सदस्यांची उपस्थिती होती. . क्लबच्या शिल्पा जाधव, सचिव विद्या जाधव, कोषाध्यक्ष मेघा देशमुख, निधी देशमुख, जयश्री ठाकरे , जयश्री चव्हाण , अपूर्वा दांडेकर, पुजा दांडेकर, कांचन भोयर , उजवला ठाकरे,नंदा देव्हारे सुषमा गायधने, शुभांगी टाले, सारिका पाबळे , शुभांगी डाखोरे , किरण गुलालकर, प्राची भोयर या सर्व क्लबच्या सदस्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

# भारत सरकारच्या आर्थिक सर्वेक्षणा साठी आंबोली गावाची निवड

**चिमूर । प्रतिनिधी**

आंबोली ही ग्रामपंचायत नवीन नवीन उपक्रम राबविण्यामध्ये अग्रेसर असून त्यातून सामाजिक विकास राजकीय विकास शैक्षणिक विकास अशा विविध विकासात्मक नवीन नवीन योजना येथील सरपंच उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य राबवित असतात. त्यामुळे आंबोली हे ग्रामपंचायत नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी जिल्ह्यात प्रचलित आहे. त्यामुळेच याआधीही राज्य शासनाने आंबोली या गावाची शैक्षणिक गुणवत्ता मोजण्यासाठी निवड केली होती आणि आत्ता सुद्धा केंद्र सरकारच्या केंद्रीय सांख्यिकीय मंत्रालय नवी दिल्ली च्या माध्यमातून चिमूर तालुक्यामधून आर्थिक सर्वेक्षणासाठी फक्त आंबोली या गावाची निवड करण्यात आली आहे.




या सर्वेक्षणात आंबोली येथील नागरिकांची आर्थिक परिस्थितीचा अभ्यास व सर्वेक्षण या मंत्राला द्वारे करण्यात येणार आहे. हे राष्ट्रव्यापी सर्वेक्षण वेळेचा सदूपयोग या विषयावर घेण्यात येणार आहे.संबंधित केंद्रीय मंत्रालयाद्वारे हे सर्वेक्षण दिनांक १४ मार्च २०२४ ते २३ मार्च २०२४ या कालावधीमध्ये घेण्यात येणार असून या कार्यक्रमाला ग्रामपंचायत आंबोलीचे सर्व पदाधिकारी तसेच अंगणवाडी सेविका पोलीस प्रशासन यांनी सहकार्य करण्याचे पत्रकाद्वारे मंत्रालयाकडून आव्हान केले असून नागरिकांनीही या कार्यक्रमाला सहकार्य करण्याचे आव्हान उपसरपंच वैभव ठाकरे यांनी केले आहे.

# सरकारने रेल्वेचा कायापालट केला-सुनिल गफाट

**पुलगाव । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने रेल्वेमध्ये आमुलाग्र बदल घडवून आणले आहेत. रेल्वेमध्ये अनेक पायाभूत सुविधा निर्माण केले आहेत. समाजाला आत्मनिर्भर करण्यासाठी एक उत्पाद एक स्टेशन हा प्रकल्प रेल्वे विभागाने सुरू केलेला आहे. हा खरोखरच अभिनंदन आहे. अजूनही मोठ्या प्रमाणावर निधी रेल्वे विभागाला प्राप्त होत आहे. त्यामुळे आपले प्रलंबित प्रकल्प लवकरच पूर्ण होतील असा विश्वास भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुनील गफाट यांनी व्यक्त केला.




रेल्वेच्या अनेक योजनांचे उद्घाटन व भूमिपूजन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दि.१२ मार्चला सकाळी ऑनलाईन पार पडले. पुलगाव रेल्वे स्थानकावर एक स्थानक एक उत्पाद या उपक्रमांतर्गत पुलगाव स्थानकावर सविता वाघ यांनी लावलेल्या केंद्राचे उद्घाटन करण्यात आले.या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुनील कपाट यांनी उद्बोधन केले. यावेळी भारतीय जनता पक्षाचे विधानसभा क्षेत्र निवडणूक प्रमुख राजेश बकाने, भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेशाध्यक्ष संजय गाते, पोलीस निरीक्षक प्रमोद बानगुले, तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष अशोक कुमार भार्गव, शहर भाजपा अध्यक्ष नितीन बडगे, प्रामुख्याने उपस्थित होते.

प्रमुख अतिथीचे स्वागत मध्य रेल्वेचे वरिष्ठ डी. ई. ई. महेश कुमार व पुलगाव रेल्वे स्थानकाचे प्रबंधक कुळकर्णी यांनी केले. प्रास्ताविक मध्य रेल्वेचे ऐ. डी. एफ. एम. सतिश रमण यांनी केले.पुलगाव रेल्वे स्थानकावर नसलेल्या रेल्वे डबा दर्शक, थांबलेले उड्डाणपुलाचे काम त्वरित सुरु करावे अशी मागणी पुलगाव विधानसभा निवडणूक प्रमुख राजेश बकाने यांनी केली.कार्यक्रमाचे संचालन रेल्वे सल्लागार समिती सदस्य सागर पेरके यांनी केले. आभार रेल्वे कल्याण निरीक्षक सुरेश पालेकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी एस.एस. ई.प्रसनजित कुमार, अरुण ढोले, वाणिज्य प्रमुख अश्विनीकुमार जयस्वाल,रेल्वे विभागाचे सर्व अधिकारी,वाणिज्य कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने महिला, पुरुष, प्रवासी उपस्थित होते.

# महिलांनी सर्वांगीण विकास साधावा-महेश गिरडकर

**चिमूर । प्रतिनिधी**

महिलांनी आपल्या न्याय हक्कासाठी सातत्याने लढत राहणे आवश्यक आहे. त्यासोबत महिला कर्मचाऱ्यांनी सर्वसामान्य दुर्लक्षित महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी सहकार्य व मार्गदर्शन करावे. देशातिल महिलांनी जागतिक स्तरावर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून महिलांनी सार्वजनिक जीवनात कार्यरत रहावे. महिलांनी आपल्या हक्कासाठी लढताना आपल्या सर्वांगीण विकास साधावा. असे प्रतिपादन राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज युवक विचार मंच सदस्य महेश गिरडकर यांनी केले.



गिरगाव येथे जागतिक महिला दिना निमित्त आयोजित कार्यक्रमाला मार्गदर्शक महेश गिरडकर तसेच अध्यक्ष म्हणून महिला आघाडी विदर्भ उपाध्यक्षा योगिता पिपरे, विदर्भ संघटिका माधुरी तलमले, संध्याताई खोब्रागडे, प्रमुख अतिथी पुष्पा करकाडे, कल्याणी चन्ने, शालीनी गिरडकर, निर्मला गिरडकर, कोमल गिरडकर, रंजना गिरडकर, तसेच महिला मंडळ मोठ्या संख्येने आदी उपस्थित होत्या.

# स्त्रियांच्या स्वअस्तित्वासाठी आर्थिक स्वावलंबन निकडीचे-ॲड.पठाण

**वरोरा । प्रतिनिधी**

लोकमान्य महाविद्यालय वरोरा येथे जागतिक महिलादिनानिमित्त आजीवन अध्ययन व विस्तार सेवा विभाग तसेच रासेयो विभागांतर्गत विद्यार्थिनींच्या समुपदेशनाचा कार्यक्रम घेण्यात आला .या कार्यक्रमाचे अध्यक्षपद महाविद्यालयाच्या प्र. प्राचार्य डॉ.जयश्री शास्त्री तर प्रमुख वक्ता म्हणून ड .समीना दस्तगीर पठाण तसेच प्रमुख उपस्थितीत सुपरीचित समाजसेविका सुवर्ण रेखाताई पाटील होत्या.




या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना ड. पठाण यांनी विद्यार्थिनींना स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी ,समाजात वावरताना आर्थिक स्वावलंबन कसे गरजेचे आहे, योग्य वेळेवर योग्य निर्णय क्षमता ,सुजाण पालकत्व अशा विविध विषयांवर मार्गदर्शन केले.सुवर्ण रेखाताई पाटील यांनी स्त्रियांकरिता निर्णय घेण्याचा अधिकार किती महत्त्वाचा आहे याबद्दल मार्गदर्शन केले .यावेळेस कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ. शास्त्री यांनी विद्यार्थिनींना प्रलोभनास बळी न पडता स्वतः विकसित कसे होता येईल याकडे लक्ष द्यावे असे सांगितले.

या प्रसंगी महाविद्यालयातील बीए अंतिम वर्षाच्या विद्यार्थिनींनी स्त्रीभ्रूणहत्या या विषयावर छोटीशी नाटिका सादर केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अल्का कुलकर्णी, प्रास्ताविक ग्रंथपाल लीना पुप्पलवार यांनी केले. तसेच आभार प्रा. गोरे यांनी व्यक्त केले. या समुपदेशनाचा लाभ महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थिनींनी घेतला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती तसेच सहकार्य लाभले .

## मुख्यमंत्री,माझी शाळा सुंदर शाळा अभियान २०२४ मध्ये

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा किरमिटी नागभिड तालुक्यातुन प्रथम तर चंद्रपूर जिल्हातुन द्वितीय क्रमांकावर

**नागभिड । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री 'माझी शाळा सुंदर शाळा' या अभियानात नागभिड तालुक्यातील जिल्हा प्राथमिक शाळा किरमिटीने प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. दि.१ जानेवारी ते १५ फेब्रुवारी या कालावधीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा हे अभियान संपूर्ण महाराष्ट्रात राबविण्यात आले. विद्यार्थी, शिक्षक, पालक, माजी विद्यार्थी यांच्यात शाळेविषयी उत्तरदायित्वाची भावना निर्माण होणे, विद्यार्थ्यांना शिकतांना प्रेरणादायी वातावरणाची निर्मिती व्हावी या साठी हे अभियान राबविण्यात आले. या अभियानात महाराष्ट्रातील अनेक शाळांनी सहभाग घेतला. नागभिड तालुक्यातील संपुर्ण शाळांनी यात सहभाग घेतला होता. त्यात नागभिड तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा किरमिटीची मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धा २०२४ मध्ये *नागभिड तालुक्यातुन सर्वश्रेष्ठ शाळा म्हणून प्रथम क्रमांकावर निवड करण्यात आली व त्यानंतर चंद्रपूर जिल्हा स्तरावर उत्कृष्ठ शाळा म्हणून द्वितीय क्रमांकावर निवड करण्यात आली. विविध निकषांवर आधारित शाळांची निवड करण्यात आली. तसेच शिक्षण विभागातील वरिष्ठांकडून मूल्यमापन करण्यात आले. जिल्हा परिषद शाळेच्या विकासासाठी ग्रामपंचायत, शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षकवृंद, माता-पालक, विद्यार्थी, पालकवर्ग आणि गावकऱ्यांचे सहकार्य लाभत आहे.जिल्हा परिषद शाळा किरमिटीच्या मुख्याध्यापिका भुमिका नागदेवते यांच्या मार्गदर्शनात शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष रामेश्वरी रडके, उपाध्यक्ष ज्योती कामडी, सदस्य सुरज चौधरी, दुधराम मोरांडे, विजय धोंगडे, डॉ.प्रशांत कामडी, मेंढे , धोंगडे, कावळे , रामटेके , निरंजना चौधरी, सपना हजारे, मेघा चौधरी, मंगेश दांडेकर, जयश्री मोरांडे, सुनील नन्नावरे, ज्ञानेश्वर नन्नावरे, रसिका लोणारे, अनिता पानसे, सविता चौधरी यांनी सहकार्य केल्याने शाळेने भरारी घेतली आहे. शाळेच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल सरपंच ईश्वर लोणारे, गट शिक्षणाधिकारी पालवे , गट विकास अधिकारी पं.स.नागभीड प्रणाली खोचरे , शिक्षण विस्तार अधिकारी सुनिता भंडारी , केंद्र प्रमुख नान्हे , ग्रामसेवक नंदु मुळणकर, माजी सरपंच मुरलीधर मोरांडे, माजी सरपंच रजनी चौधरी, उपसरपंच राजकुमार दडमल, ग्रा.पं.सदस्य सुरज चौधरी, उज्वला मोरांडे, करुणा पानसे, सुनंदा देशमुख, आशा नन्नावरे यांनी शिक्षकवृंद तथा विद्यार्थ्यांचे कौतुक केले. सर्व शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, कर्मचारी व सर्व विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेऊन शाळेला नवी दिशा देण्याचे कार्य केले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .